# मुंबई विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/९९५
दिनांक : २९.११.२०२३

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : नव-मतदार नोंदणी व जनजागृती उपक्रम.**

मा. महोदय/महोदया,

लोकशाही समाजरचनेमध्ये मतदानाला अनन्य साधारण महत्व आहे. मतदान हा नागरीकांचा मुलभूत अधिकार आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी १८ वर्षावरील सर्व नागरीकांनी मतदान आवश्यक आहे. त्यासाठी १८ वर्षावरील सर्व नागरीकांना मतदाता म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात, त्याचप्रकारे नवमतदार नोंदणी व मतदान जनजागृती हा उपक्रम देखील देखील प्रामुख्याने राबविण्यात यावा.

महाविद्यालय स्तरांवर नवमतदार नोंदणी मोहिमे अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात यावेत व समाजामध्ये मतदानाचा हक्क बजावण्याकरीता जनजागृती करण्यात यावी.

खालील उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर उपक्रम दरम्यान राबविण्यात यावेत.

- शहर/गावांतील महाविद्यालयातील १८ वर्षे पुर्ण झालेल्या नव-मतदारांना नावनोंदणी करण्यात प्रोत्सोहित करावे.
- याबाबत नजिकच्या निवडणूक कार्यालय/अधिकारी यांची मदत घ्यावी.
- नव-मतदारांना मतदान नोंदणी फॉर्म भरण्यासाठी मदत करावी.
- महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयात महाविद्यालयातील नव-मतदारांना नावनोंदणी करण्यासाठी आवश्यक-ती व्यवस्था करावी.
- याबाबत संबंधीत निवडणूक कार्यालयातील अधिकारी यांना व्याख्यानासाठी शिबिरात/ महाविद्यालयात आमंत्रीत करावे.
- आवश्यकतेनुसार पोस्टर/ भिंत्ती चित्रे/ मतदार नोंदणी बाबतचे इतर साहित्य संबंधीत नजीकच्या निवडणूक कार्यालयातून आणून महाविद्यालयात प्रदर्शन लावणे.
- प्रभातफेरी/रॅली/पथनात्य इत्यादी द्वारे नवमतदार नोंदणी व मतदान जगजागृती करण्यात यावी.

**आपला**

सुशील शिंदे
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**-Sd-**
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**